# देगलूर महाविद्यालयाचा विद्यापीठात सन्मान



**जनतेचे मत न्यूज नेटवर्क**
**देगलूर / अमोल कुमार शिंदे**

स्वा.रा.ती.मराठवाडा विद्यापीठ,नांदेड येथे शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये विविध क्षेत्रात गुणवंत विद्यार्थी व खेळाडूंचा सत्कार व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला आहे.या सोहळ्यात देगलूर महाविद्यालयाचा खेळाडू श्री.हेमनर अनिल गोविंदराव यांचा मागील वर्षात TNPES विद्यापीठ, चेन्नई येथे संपन्न झालेल्या दक्षिण - पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ ॲथलेटीक्स स्पर्धा.रिले (4×400) स्पर्धेत व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र झाल्यामूळे खेळाडूचा व महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.मोहन खताळ , खेळाडू अनिल हेमनर या गुणवंत खेळाडूचे प्रशिक्षक व महाविद्यालयाचे क्रीडा संचालक लेफ्ट.डॉ.निरज उपलंचवार यांचाही विद्यापीठाने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार केला आहे.या सन्मानाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेंबरेकर, सचिव शशिकांत चिद्रावार , उपाध्यक्ष नागनाथराव मन्नागीरे , सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास होटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ कर्मवीर उंग्रतवार , जनार्दन चिद्रावार ,गंगाधर जोशी, रवींद्र अप्पा दाडे. देवेंन्द्र मोतेवार , चंद्रकांत नारलावार,प्राचार्य डॉ. मोहन खताळ ,उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे , पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील , कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांच्यासह सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे

Scanned with OKEN Scanner